# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-२/महाराष्ट्र राज्य बँक असोसिएशन /नि.का.मंजूरी/आदेश/ /२०१५/5667 दिनांक 30 /०६/२०१५

वाचावे :-

१. प्राधिकरणाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम ३ (४) ची जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक प्रक्रिया घोषणा/६१४/२०१४ दि.३०/१०/२०१४ व जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक प्रक्रिया घोषणा/८०२/२०१४ दि.१९/११/२०१४.

२. प्राधिकरणाकडील निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्तीचे आदेश जा.क्र. रासनिप्रा/मुंबई / अ वर्ग/सहकारी संस्था/नि.नि.अ./नेमणुक/ ४८६९ /२०१५,दि. ०२/०६/२०१५.

३. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-२/अ वर्ग/नि.का.मंजूरी/आदेश/५६१६/२०१५, दिनांक २६/०६/२०१५.

४. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, के- पुर्व विभाग, मुंबई यांचेकडील प्रस्ताव दिनांक २९/०६/२०१५.

५. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम १८ मधील तरतुद.

प्रस्तावना :-

ज्या अर्थी वाचले क्रमांक १ अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम ३ (४) नुसार राज्यातील संचालक मंडळाची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुक प्रक्रिया सुरु करणेचे घोषणा / आदेश जिल्हा/ तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी यांना दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई यांनी निवडणुक प्रक्रिया सुरू केलेली असून **महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या.मुंबई साखर भवन,प्लॉट नं.२३० ब्लॉक नं.३बँक बे रेक्लेमेशन ,नरीमन पॉईंट,मुंबई -२१** ही सहकारी संस्था मुंबई या नियम ४ (II) नूसार अ प्रकारात मोडणा-या संस्थेची दि. १८/०६/२०१५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केलेली आहे आणि,

ज्या अर्थी इकडील वाचावे क्रमांक २ चे आदेशानुसार उक्त संस्थेवर प्राधिकरणाने निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून श्री. जे.डी. पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था, के/ पूर्व विभाग मुंबई यांची नियुक्ती केलेली असून त्यांनी सादर केलेल्या निवडणूक कार्यक्रमास प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ३ च्या आदेशान्वये मंजूरी दिलेली होती. तथापि, सदर कार्यक्रमास स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देता आलेली नसल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वाचावे क्रमांक ४ अन्वये नव्याने निवडणूक कार्यक्रम तयार करून प्राधिकरणाच्या मंजुरीस्तव सादर केलेला आहे. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १९ नुसार अ वर्गातील सहकारी संस्थेस प्राधिकरणाने मंजूर केलेल्या निवडणूक कार्यक्रमास किमान एका स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देणे अनिवार्य आहे.

त्या अर्थी प्राधिकरण उक्त प्रस्तावित निवडणुक कार्यक्रमाबाबत पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम १८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानूसार प्राधिकरण **महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या.मुंबई साखर भवन,प्लॉट नं.२३० ब्लॉक नं.३बँक बे रेक्लेमेशन ,नरीमन पॉईंट,मुंबई -२१** या संस्थेच्या निवडणूकीकरीता उपरोक्त वाचावे क्रमांक ३ ,दिनांक २६/६/२०१५ अन्वये मंजुर केलेला निवडणूक कार्यक्रम रदद करून उपरोक्त वाचावे क्रमांक ४ अन्वये फेरसादर केलेला निवडणूक कार्यक्रम दुरूस्तीसह मंजुर करीत आहे.

संस्थेचा निवडणूक कार्यक्रम दुरूस्तीसह मंजुर करीत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेशाने**

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई.

२. श्री. जे.डी.पाटील,उपनिबंधक,सहकारी संस्था,के/पूर्व विभाग,मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुका) नियम २०१४ व संस्थेचे मंजुर उपविधीनूसार निवडणूक पार पाडुन निवडणूक निकाल जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांच्या मार्फत सादर करावा.

प्रत माहितीसाठी :-

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या.मुंबई साखर भवन,प्लॉट नं.२३० ब्लॉक नं.३वँक वे रेक्लेमेशन ,नरीमन पॉईंट,मुंबई -२१.

नमुना इ-८

(नियम -१९ पहा)

निवडणूक निर्णय अधिकारी :- उपनिबंधक ,सहकारी संस्था ,के-पुर्व विभाग मुंबई बिल्डींग न.ए. रुम.न.३१५ तिसरा मजला डाला ट्रक टर्मिनल .आर.टी.ओ.ऑफीस जवळ वडाळा (पुर्व) मुंबई

**संस्थेचे नाव :- महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. मुंबई साखर भवन ,प्लॉट न.२३० ब्लॉक न.३ बॅक वे रेक्लेमेशन ,नरीमन पॉईट मुंबई -०२१**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ यांच्या नियम १९ प्रमाणे अधिकारांचा वापर करुन आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था विभाग मुंबई यांनी जाहीर केलेल्या वरील सहकारी संस्थेचा सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीमाटीचा निवडणूक कार्यक्रम मी, जे. डी. पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पुर्व विभाग, मुंबई निवडणूक निर्णय अधिकारी - महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. मुंबई साखर भवन ,प्लॉट न.२३० ब्लॉक न.३ बॅक वे रेक्लेमेशन ,नरीमन पॉईट मुंबई -०२१ जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या पुर्व मान्यतेने जाहीर करत आहे. सदर कार्यक्रमातील विशिष्ट टप्पे संबंधीत मतदार संघानुसार सोबत जोडलेल्या अनुसूचीप्रमाणे जाहीर करीत आहे.

| अ.क्र | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशनपत्रे मिळण्याची व दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशन पत्राच्या छाननीसाठी तारीख ,वेळ व स्थळ | विधीग्राह्य नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करण्याची तारीख ,वेळ व स्थळ | उमेदवारांना नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची तारीख ,वेळ व स्थळ | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व स्थळ | मतदान मोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ |
| ०१ | १.सभासद साखर कारखान्यांचे प्रतिनिधी - १६<br>२.अनु.जाती/जमाती प्रतिनिधी-- ०१<br>३.महिला प्रतिनिधी -- ०२<br>४.इतर मागासवर्गीय प्रतिनिधी -- ०१<br>५.भटक्या विमुक्त जाती /जमाती/ विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी -- ०१<br>एकूण - २१ | दिनांक ०१/०७/२०१५ ते ६.०७.२०१५ वेळ ११.०० ते ३.०० (सुट्टीचे दिवस वगळता) | १.०७.२०१५ ते ६.०७.२०१५ पर्यंत प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता | दिनांक ७.०७.२०१५ वेळ ११.०० वाजता | ८.०७.०१५ वेळ ११.०० वा. | ८.०७.२०१५ २२.०७.२०१५ सकाळी ११.०० ते ३.०० | २३.०७.१५ दुपारी ३.०० ते ४.०० | ०९.०८.१५ सकाळी ९.०० ते ५.०० | ०९.०८.२०१५ मतदानानंतर लगेच | मतमोजणी नंतर |
| | | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | | | | | | ठिकाण नंतर जाहीर करण्यात येईल. | | |

टिप : १) स्तंभ क्र.६ व ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी संबंधीत संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल (२) मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये विकत मिळू शकेल. (३) नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हाच्या यादीमधून चिन्ह निवडावयाचे आहे. (४)निवडणूक चिन्हांचे वाटप स्तंभ ८ मधील तारखेस व ठिकाणी दुपारी ३.०० वाजता करणेत येईल. (५) नामनिर्देशन पत्रांची छाननी केल्यानंतर त्यांची प्रसिध्दी. मतदान व मतमोजणीचे दिवस वगळून निवडणूक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक सुटया खेरील सुरु राहील.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता : **महाराष्ट्र राज्य सहकारी ~~साखर~~ कारखाना संघ मर्या. मुंबई साखर भवन ,प्लॉट न.२३० ब्लॉक न.३ बॅक वे रेक्लेमेशन ,नरीमन पॉईट मुंबई -०२१**

संपर्क क्रमांक :-- ९८९००८३६५०

निवडणूक निर्णय अधिकारी

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी

सचिव राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण